**उप वनसंरक्षक, ठाणे वन विभाग यांचे कार्यालय**
लाल बहादूर शास्त्री मार्ग, मॅरेथॉन सर्कल, नौपाडा, ठाणे (पश्चिम) – ४००६०२
☎०२२-२५४२१३७३, Email : dcfthane@gmail.com

पत्र

विषय : वनजमीन-ठाणे
वन (संर्वधन) अधिनियम १९८० अंतर्गत कार्यकारी अभियंता (अभियंत्रिकी विभाग) एम.एम.आर.डी. राष्ट्रिय महामार्ग क्र.४ (मुंबई ते पुणे) ते कटाई जंक्शन दरम्यान जोडरस्ता बांधण्याकरिता मौजे-देसाई ता.व जि. ठाणे येथील ०.८३२५हे. कांदळवनक्षेत्र वळतेकरण्याबाबत.

जा.क्र. कक्ष-/२५/एफसीए-११/ ३५३५ /२०१८-१९

ठाणे – ४००६०२ दिनांक : २४ ऑक्टोबर, २०१८

प्रति,

कार्यकारी अभियंता,
इंजिनियरींग डिव्हीजन, एमएमआरडीए,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई.

संदर्भ :
१) महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक-एफएलडी-१२१८/प्र.क्र-१९५/फ-१० दिनांक-३०-०७-२०१८
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी म.रा.नागपूर यांचकडील पत्र क्र. कक्ष-१७ / नोडल / आरएस-२ /आयडी-१२६१७(६३)/९८३ / दि-०१-०८-२०१८

म.म.प्र.वि.प्रा. अभियांत्रिकी विभाग 26/10/18

विषयांकित प्रस्तावांतर्गत ०.८३२५ हे. कांदळवनाचे क्षेत्र वळते करण्यास राज्य शासनाचे संदर्भीय पत्र क्रमांक १ अन्वये काही अटींवर तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर तत्वत: मंजूरीच्या पत्रातील खालील अटींवरील पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा.

ii) प्रस्तावांतर्गत वळते होणा-या क्षेत्राच्या मोबदल्यात १.०० हेक्टर अवनत वनक्षेत्रावर पर्यायी वनीकरण योजने अंतर्गत वनीकरण करण्यासाठी सन २०१८-१९ च्या दरानूसार रक्कम रु. ५,४६,१७६/- चा भरणा E-Payment Portal वर E-Challan व्दारे Ad-Hoc CAMPA यांच्याकडे करावा व त्याबाबतच्या पावतीची प्रत या कार्यालयास सादर करावी. तसेच पर्यायी वनीकरणाकरिता खर्चाच्या रक्कमेत वाढ झाल्यास सुधारीत दरांने येणारी वाढीव रक्कम भरण्यास तयार असल्याचे हमीपत्र सादर करावे.

iv) प्रस्तावांतर्गत वळते होणा-या ०.८३२५ हे. वनक्षेत्राच्या नेट प्रेझेन्ट व्हॅल्यूची रक्कम रु. ६,०७,७२५/- चा भरणा E-Payment Portal वर E-Challan व्दारे Ad-Hoc CAMPA यांच्याकडे करावा व त्याबाबतच्या पावतीची प्रत या कार्यालयास सादर करावी.

v) केंद्र शासनाच्या नविन मार्गदर्शक सूचनेनुसार सुधारित दरानुसार प्रकल्प यंत्रणेस नक्त वर्तमान मूल्याची रक्कम भरण्यास तयार असल्याबाबत बंधपत्र देणे आवश्यक आहे.

vi) जनहित याचिका क्र. ८७/२००६ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २७.०१.२०१० रोजी दिलेल्या आदेशांनूसार प्रकल्पांतर्गत वळते होणा-या कांदळवन क्षेत्रातील कांदळवन वृक्षांची तोड करण्याकरीता मा. उच्च न्यायालयाची पूर्व परवानगी प्राप्त करुन घ्यावी.

ix) प्रस्तावाअंतर्गत वळते होणा-या क्षेत्रातील बाधीत होणा-या वृक्षतोडीकरिता किंवा पुन:लागवड करण्यासाठी- ९११०/- रक्कमेचा उप वनसंरक्षक ठाणे यांचे नावे राष्ट्रीयीकृत बँकेचा धनाकर्ष (डी.डी) पाठविण्यात यावा.तसेच या कामी खर्चाच्या रकमेत वाढ झाल्यास वाढीव रक्कम भरण्यास तयार असल्याबाबतचे हमीपत्र सादर करावे.

xiii) प्रकल्पामुळे बाधित होणा-या क्षेत्रातील तोड करावयाच्या वृक्षांवर राहणा-या पक्षांच्या निवासाची पर्यायी व्यवस्था करण्यासाठी आजुबाजुच्या परिसरात पर्यावरण पुरक कृत्रीम घरटयांचा वापर करण्यासाठी रक्कम रुपये-६०००/- चा भरणा E-Payment Portal वर E-Challan व्दारे Ad-Hoc CAMPA कडे करावा. व त्याबाबतच्या पावतीची प्रत या कार्यालयास सादर करावी.

तसेच प्रकल्पांतर्गत वळते होणारे वनक्षेत्राचे सिमांकन करिता हद्दीवर आर.सी.सी.पिलर उभारण्यासाठी रु.२०५७/- प्रती पिलर या दराने १२ पिलर करिता एकूण रक्कम रुपये २४६८४/- चा भरणा E-Payment Portal वर E-Challan व्दारे Ad-Hoc CAMPA कडे करावा.

तत्वत: मंजूरीच्या पत्रातील अट क्र. i, iii, vii, viii, x, xi, xii, xiv, xv, xvi, xvii, xviii, xix, xx, xx मध्ये नमूद केल्यानूसार कार्यवाही करण्यास प्रकल्प यंत्रणा तयार असल्याबाबतचे हमीपत्र (undertaking) आवश्यक कागदपत्रासह ५ प्रतीत या कार्यालयास सादर करावे.

वरील प्रमाणे पुर्तता तात्काळ करण्यात यावी जेणेकरुन या स्तरावरील पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

(डॉ. जितेन्द्र रामगावकर)
उप वनसंरक्षक
ठाणे वन विभाग, ठाणे

प्रतिलिपी : मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांच्याकडे माहितीसाठी सादर.